# सरळसेवा नियुक्ती आदेश

जा.क्र. ------
----- विभाग, जिल्हा परिषद,----
दिनांक :-

**वाचा :-**

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७
२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अनिओ/१००५/१२६/सेवा-४, दि.३१-१०-२००५.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)/१३-अ, दि. १९-१०-२००७.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरकव्ह-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दि. २८-२-२०१३.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रनिमं-२००७/प्र.क्र.(४६/०७)/१३-अ, दि. २७-६-२००८.
६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रनिमं-१२१४/प्र.क्र.(४३/०७)/१३-अ, दि. ५-६-२०१४.
७. शासन परिपत्रक, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्र.एपिटी-२०१४/प्र.क्र.१३९/आस्था-८, दि. ५-७-२०१४.
८. जिल्हा निवड समिती--------- निवडीसाठी केलेली शिफारस दि.---------

[अनुसूचित क्षेत्रातील मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी पारित केलेले दि.९-६-२०१४ च्या अधिसूचनेतील पदांकरिता शासन परिपत्रक क्र. एपिटी-२०१४/प्र.क्र.१५३/आस्था-८, दि. ५ ऑगस्ट २०१४ व दिनांक २१ ऑगस्ट २०१४ चा समावेश करणे आवश्यक राहील.]

**आदेश :-**

जिल्हा निवड समिती / जिल्हा परिषद निवड समिती ---- कडून शिफारस केलेल्या खालील उमेदवारांची जिल्हा सेवा (गट क)----- ( * ---- येथे दुय्यम लिपिकवर्गीय/ तांत्रिक सेवा ई चा उल्लेख करावा.) / (गट ड) ----- या पदावर वेतनश्रेणी रु.------- (ग्रेड वेतन रु.------) या वेतन संरचनेत अधिक नियमानुसार अनुज्ञेय महागाई भत्ता व इतर भत्ते मध्ये नियुक्ती करण्यात येऊन त्यांची पदस्थापना जिल्हा परिषद,------- अंतर्गत त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी रिक्त पदावर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव व पत्ता | नियुक्ती व पदस्थापनेचे ठिकाण | नियुक्तीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| | | | |

उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१. उमेदवारांनी पदस्थापनेच्या ठिकाणी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसाचे आत हजर व्हावे. उमेदवार मुदतीच्या आत त्यांचे नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास नियुक्तीचा हक्क रद्द होईल.

२. उमेदवार जिल्हा अंतर्गत कोठेही बदलीस पात्र राहील.

३. नेमणुकीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

४. उमेदवारांची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असेल.

५. उमेदवारास जिल्हा परिषद सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिना पूर्व नोटीस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे मूळ वेतन जिल्हा परिषद निधीत / शासन खाती जमा करावे लागेल.

६. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२ डिसेंबर, २०११ अन्वये ज्या उमेदवाराची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली व ज्यांचा जाती दाव्याची पडताळणी झालेली नाही अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. नियुक्ती स्वीकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा लागेल व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत सादर करावी लागेल. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरित रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल. याचिका क्रमांक २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा. सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश देण्यात येत आहेत.

( या तरतुदीनुसार यादीतील अ.क्र. ---- वरील उमेदवारांनी पूर्तता करणे आवश्यक आहे.)

७. उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा ( सेवेच्या सर्वसाधारण शर्ती ) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून वैद्यकीय तपासणी अंती पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या अधिनतेने नियुक्ती देण्यात येत आहे. ( कारण ही कार्यवाही नियुक्ती प्राधिकाऱ्याने करुन घेणे बंधनकारक आहे.)

८. अनुसूचित क्षेत्राकरिता मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ९ जून, २०१४ च्या अधिसूचनेव्दारे निश्चित केलेल्या पदांच्या अनुषंगाने नियुक्त उमेदवार अनुसूचित क्षेत्राच्या बाहेर बदलीपात्र असणार नाही.

९. गट-क मधील उमेदवारास शासन सेवेतील नियुक्तीकरिता शासनाने विहित केलेले आवश्यक संगणक अर्हता शिक्षण / परीक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाचे आत उत्तीर्ण होवून प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१०. गट-क मधील उमेदवारास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ८ नुसार शासनाने विहित केलेली, तसेच वेळोवेळी विहित करीत अशा विभागीय परीक्षा/ भाषा परीक्षा/ प्रशिक्षण अर्हता विहित संधी व मुदतीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक राहील. प्रचलित नियमानुसार विभागीय परीक्षा (सेवाप्रवेशोत्तर परीक्षा) चार वर्षात व ३ संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

११. महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) सेवाप्रवेश नियम १९६७ मधील नियम ६(५) नुसार उमेदवाराचा सदर पदावर परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असेल. परंतु उमेदवाराचे काम सदर परिविक्षाधीन कालावधीत आवश्यक त्या दर्जाचे नाही असे आढळून आल्यास संबंधित उमेदवाराचा परिविक्षाकाल वाढविण्यात येईल.

१२. महाराष्ट्र जिल्हा परिषद ( जिल्हा सेवा) प्रवेश नियम १९६७ मधील ६(६) अन्वये उमेदवाराने एक वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड मुदतीसाठी या पदावर समाधानकारकरित्या सेवा केल्यास किंवा परिविक्षेची मुदत समाधानकारकरित्या पूर्ण केली असेल आणि विभागीय परीक्षा किंवा इतर कोणतीही असल्यास, भाषा परीक्षा उत्तीर्ण झाली असेल तो किंवा हे पद धारण करण्याकरिता शासनाने ठरविलेले (असल्यास) प्रशिक्षण उमेदवाराने यशस्वीरित्या घेतलेले असल्याशिवाय प्रशिक्षण उमेदवाराने यशस्वीरित्या घेतलेले असल्याशिवाय उमेदवारास जिल्हा सेवेतील पदावर कायम करण्यात येणार नाही.

१३. उमेदवारास संदर्भीय शासन निर्णय दिनांक ३१-१०-२००५ मधील सूचनांनुसार नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. तसेच भविष्य निर्वाह निधी, अंशराशीकरण इत्यादी संबंधित वेळोवेळी दिलेले आदेश / निर्णय / परिपत्रके यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

१४. संबंधित उमेदवार यांना नियुक्तीचे ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

१५. उमेदवाराची नियुक्ती जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी अहवालाचे अधीन राहील. याबाबतचे अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१६. उमेदवारास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २८ मार्च, २००५ आणि शासन परिपत्रक दिनांक १ जुलै, २००५ मधील नमूद, महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१७. सदर आदेशाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधितांचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशीअंती त्यात तथ्य दिसून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी / नियुक्तीसाठी सादर

केलेली सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,-----**

**प्रतिलिपी माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर-**

१) अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, ----- यांना माहितीस्तव सादर.

२) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,-----

३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद,-----

४) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी,-----

५) ----------- (विभाग / कार्यालय प्रमुख ) यांना देवून सूचित करण्यात येते की, आदेशात नमूद अटी व शर्तीनुसार पूर्तता करुन उमेदवाराची सर्व मूळ प्रमाणपत्राची पडताळणी करुन कामावर रुजू करुन घेवून अहवाल सादर करावा. सदर उमेदवार मुदतीत हजर न झाल्यास तसेही तात्काळ कळवावे. ( तसेच नियुक्ती आदेशातील अट ७ प्रमाणे कार्यवाही करावी. )

६) संबंधित उमेदवार

७) आदेश संचिका

# अनुकंपा नियुक्ती आदेश

जा.क्र.----

----- विभाग, जिल्हा परिषद---

दिनांक :

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक अकंपा-१०९३-२३३५/प्र.क्र.९०-९३,८, दि. २६-१०-१९९४

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र. अकंपा-१०९५-२३३५/प्र.क्र.३४-अ/आठ, दि.२३-८-१९९६.

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ,दि. २२-८-२००५

४) ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र.३/अकंपा/१०००/प्र.क्र.२८२०/१५, दि.२१-७-२०००.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अकंपा-१०४०/प्र.क्र.२०/२०००/आठ, दि.२६-१०-१९९४.

६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनया-१००५/१२६/सेवा-४,दि. ३१-१०-२००५

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००७/१२८५/प्र.क्र.१८१-०७/८४, दि.२३-४-२००८

८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. अकंपा-१०००/प्र.क्र.३१८,१० आठ मंत्रालय,मुंबई, दि.६-१२-२०१०

९) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अकंपा-१०००/प्र.क्र.-१/२०१०/वित्तीय सुधारणा-१, दि.५-६-२०१०.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग,क्र.पदनि/२०१२/प्र.क्र.१५/वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय,मुंबई, दि.२२-३-२०१२.

**आदेश :**

ज्या अर्थी संदर्भिय क्रमांक-११ च्या शासन निर्णयान्वये गट-क व गट-ड संवर्गातील दि.२२-८-२००५ नंतरच्या अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवारासाठी निर्बंध शिथिल केलेले आहेत.

त्या अर्थी मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद----- मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार व उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिनांक-------- नंतरच्या अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षा सूचीवरील रकाना क्र.३ मधील खालील दर्शविलेले उमेदवारांची अनुकंपा कारणास्तव जिल्हा परिषद सेवेत, शैक्षणिक पात्रता व उपलब्ध रिक्त पदानुसार जिल्हा सेवा (गट-क/ड) या संवर्गातील पदावर त्यांचे नावासमोर रकाना क्रमांक ४ मधील दर्शविलेल्या ठिकाणी पुढील शर्ती व अटीस अधीन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मयत कर्मचाऱ्याचे नाव व मृत्युवेळी कार्यरत पदनाम | नियुक्ती द्यावयाचे वारस अर्जदाराचे नांव व रकाना २ मधील कर्मचाऱ्याशी नाते | नियुक्तीचे पद | वेतनश्रेणी व ग्रेड-पे | उमेदवाराचा प्रवर्ग | नियुक्तीचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.**

१. सदर आदेश मिळाल्यापासून ३० दिवसाचे आत पदस्थापनेच्या जागी उपस्थित व्हावे अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द समजण्यात येईल. उमेदवार जिल्हा अंतर्गत कोठेही बदलीस पात्र राहील.

२. पदस्थापनेच्या जागी रुजू होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

३. सदरची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणतेही कारण न दर्शविता सेवेतून कमी करता येईल.

४. जिल्हा परिषदेची सेवा सोडावयाचे असल्यास एक महिना पूर्वसूचना / नोटीस द्यावी लागेल किंवा एक महिन्याचा मूळ पगार जिल्हा निधीत जमा करुन राजीनामा मंजूर करवून घेणे आवश्यक राहील.

५. उपस्थित होताना नियमानुसार विहित नमुन्यात लेखी करारपत्र (ॲग्रीमेंट) संबंधित अधिकारी / कार्यालय प्रमुखाकडे द्यावे लागेल.

६. जिल्हा शल्य चिकित्सक यांचेद्वारे शारीरिकदृष्टया पात्र ठरविण्याच्या प्रमाणपत्राच्या अधिनतेने नियुक्ती देण्यात येत आहे.

७. संबंधितांनी नियुक्तीनंतर वाढीव शैक्षणिक पात्रता धारण / अर्हता केली तरी त्याचा शासनाचे आदेश / मार्गदर्शन सूचना नियमानुसारच वरिष्ठ पदावरील नियुक्तीकरिता विचार करण्यात येईल.

८. शासनाचे जिल्हा परिषदेचे वेळोवेळीचे आदेश / सूचना / नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९. मागास प्रवर्गातील उमेदवाराने त्याची जात प्रमाणपत्राची वैधता जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील.

१०. महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) सेवाप्रवेश नियम १९६७ मधी नियम ६(५) नुसार सदर पदावर परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असेल. परंतु संबंधित उमेदवाराचे काम सदर परिविक्षा कालावधीत आवश्यक त्या दर्जाचे नाही असे आढळून आल्यास परिविक्षा अवधी वाढविण्यात येईल.

११. गट-क च्या पदावर नियुक्ती झाल्यास उमेदवारास शासन सेवेतील नियुक्तीकरिता शासनाने विहित केलेले आवश्यक संगणक अर्हता शिक्षण / परीक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाचे आत उत्तीर्ण होवून प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१३. गट-क च्या पदावर नियुक्ती झाल्यास उमेदवारास महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ८ नुसार शासनाने विहित केलेली, तसेच वेळोवेळी विहित करीत अशा विभागीय परीक्षा / भाषा परीक्षा / प्रशिक्षण अर्हता विहित संधी व मुदतीमध्ये प्राप्त करणे

बंधनकारक राहील. प्रचलित नियमानुसार विभागीय परीक्षा (सेवाप्रवेशोत्तर परीक्षा) चार वर्षात व ३ संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

१४. संबंधितास सदर पदावर देण्यात येणारी नियुक्ती शासन पत्र दिनांक २१-७-२००० अन्वये जेष्ठतेनुसार आणि रिक्त पदावर असून ते स्वीकारणे बंधनकारक आहे. सध्याची नेमणूक नाकारल्यास त्यांची अनुकंपा तत्वावरील नेमणूक रद्द करण्यात येईल.

१५. अविवाहित महिला उमेदवार / विधव महिला यांचेबाबतीत त्यांनी विवाह / पुनर्विवाह केला नसल्याबाबत शपथपत्र उपस्थित होताना कार्यालय प्रमुखाकडे देणे बंधनकारक राहील.

१६. सदर अनुकंपा उमेदवारास मयत कर्मचाऱ्याचे कुटुंबातील इतर सदस्याचे पालन पोषण / सांभाळ करणेबाबत शपथपत्र उपस्थित होताना कार्यालय प्रमुखांकडे देणे बंधनकारक राहील.

१७. संबंधित उमेदवार यांना नियुक्तीचे ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.

१८. उमेदवाराची नियुक्ती जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी अहवालाचे अधीन राहील. याबाबतचे अहवालात काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास सदरची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१९. संबंधितास शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ३१-१०-२००५ नुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. तसेच सेवानिवृत्ती अंशराशीकरण, भविष्य निर्वाह निधी इत्यादी संबंधित शासनाचे वेळोवेळीचे आदेश, निर्णय, परिपत्रके इत्यादीचे पालन करणे बंधनकारक राहील.

२०. उमेदवारास महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २८ मार्च २००१ मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

२१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २३ ऑगस्ट, १९९६ मधील तरतुदीनुसार उमेदवार गट-क ची पात्रता धारण करीत असेल व गट-क मध्ये पद उपलब्ध नसल्यास अगर उमेदवारास गट-ड मध्ये नियुक्ती देण्यात येत आहे व गट-क मधील पद उपलब्ध होताच त्यांची गट-क मध्ये प्राधान्याने नियुक्ती देण्यात येईल. ( प्रकरणपरत्वे विचार करुन ही अट नमूद करण्यात यावी.)

२२. अनुकंपा नियुक्तीकरिता सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने नियुक्ती दिल्यानंतर संबंधितांचे नियुक्तीबाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशीअंती त्यात तथ्य दिसून आल्यास अगर नियुक्तीचे वेळी/ नियुक्तीसाठी सादर केलेली माहिती चुकीची आढळून आल्यास दिलेली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर व कोणत्याही वेळी रद्द करण्यात येईल. कोणतीही माहिती चुकीची / खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास नियुक्ती कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,-----**

प्रतिलिपी :-

१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद-----

२) ---------------जिल्हा परिषद,--------

३) गट विकास अधिकारी,पंचायत समिती,---------

४) ----------------( विभाग / कार्यालय प्रमुख ) यांना देवून सूचित करण्यात येते की, आदेशात नमूद अटी व शर्तीनुसार पूर्तता करुन उमेदवाराची सर्व मूळ प्रमाणपत्राची पडताळणी करुन कामावर रुजू करुन घेवून अहवाल सादर करावा. सदर उमेदवार मुदतीत हजर न झाल्यास तसेही कळवावे.

५) संबंधित उमेदवार.

६) आदेश संचिका.

<u>पदोन्नती संदर्भात नमुना टिपणी</u>

जिप-----/कार्यालय

विषय :- ----------या पदावरुन------------पदावर पदोन्नती करणेबाबत.

सादर.

जिल्हा,--------,-------- विभागांतर्गत------------पदावरुन -----पदावर पदोन्नती देणेसंदर्भात खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१) सेवा प्रवेश नियमानुसार ज्या पदावरुन पदोन्नती द्यावयाची ते पद व वेतनश्रेणी ----------
२) ज्या पदावर पदोन्नती द्यावयाची ते पद व वेतनश्रेणी -----------------------------
३) पदोन्नतीच्या पदांची टक्केवारी,------------ - -----------------------------(सेवा प्रवेश नियमाची प्रत संलग्न)
४) एकूण मंजुर पदे----------त्यापैकी पदोन्नतीने भरावयाची पदे--------------------
५) पदोन्नतीने भरलेली पदे--------------------------------------------------------
६) प्रस्तूत पदोन्नतीच्या दृष्टीने दि.............. च्या आदेशान्वये पदोन्नती समिती गठीत करण्यात आली आहे. या विभागीय पदोन्नती समितीची संरचना (अध्यक्ष/सदस्य) खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १) | - अध्यक्ष |
| २) | - सदस्य |
| ३) | - सदस्य |
| ४) | - सदस्य सचिव |

७) पदोन्नतीसाठी निकष:-

महाराष्ट्र जिल्हा परिषद (जिल्हा सेवा) नियम १९६७ मधील परिशिष्ट -----मधील नियम-----नुसार या पदावर --------वर्षाहून कमी नसेल इतक्या कालावधीत अखंड सेवा आणि विभागीय/सेवाप्रवेश* परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्यांना पदोन्नती देता येईल. तसेच ------ ही परीक्षा सुध्दा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. * तसेच संबंधीत कर्मचारी के MSCIT अगर शासनाने शासन निर्णय क्रमांक सा.प्र.विभाग दि.--------अन्वये समकक्ष/पर्याय म्हणुन घोषित केलेला कोर्स उत्तीर्ण आहेत.

८) पदोन्नतीने भरावयाच्या पदांपैकी एकूण रिक्त पदे-------------
- अ) पैकी से.नि.मुळे रिक्त--------------------------------
- ब) पदोन्नतीमुळे रिक्त-----------------------------------
- क) मृत्यू मुळे रिक्त--------------------------------------
- ड) राजीनामा/सेवेतून काढून टाकणे इ.मुळे रिक्त------------

९) सध्या रिक्त नसलेल्या मात्र नजिकच्या कालावधीत (संभाव्य) दि.३१,ऑगस्ट, ---- पर्यंत रिक्त होणारी रिक्त पदे व रिक्त होण्याचा दिनांक व कारणे-------* अशा पदाचा विचार पदोन्नतीसाठी करावयाचे प्रस्तावित असल्यासच ही माहिती भरावी)

१०) पदोन्नतीसाठी एकूण उपलब्ध पदे (६ +७)

११) दिनांक ----------रोजी बिंदू नामावलीनुसार प्रवर्ग निहाय रिक्त पदांची (पदोन्नतीने भरण्याची) स्थिती खालील प्रमाणे आहे. (संभाव्य रिक्त पदे विचारात घेणार असल्यास ही माहिती भरावी)

| विवरण | प्रवर्गनिहाय आरक्षण | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ जा | अ ज | विजा अ | भजब | भज क | भज ड | विजाअ भज एकूण | विमा प्र | खुला | |
| आरक्षणाची टक्केवारी | | | | | | | | | | |
| मंजूर पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| कार्यरत पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| रिक्त पदे | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| *रिक्त होणारी पदे | | | | | | | | | | |
| एकुण रिक्त पदे - | | | | | | | | | | |

वरील तक्त्यात रिक्त पदांची स्थिती दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकरीता प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | प्रवर्ग | रिक्त पदांची संख्या | पदोन्नतीकरीता प्रस्तावित कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | खुला | -- | -- |
| २ | अ.जा. | -- | -- |
| ३ | अ.ज. | -- | -- |
| ४ | वि.जा.अ. | -- | -- |
| ५ | भजब | -- | -- |
| ६ | भजक | -- | -- |
| ७ | भजड | -- | -- |
| ८ | विमाप्र | -- | -- |
| एकूण | | | |

--------------पर्यंतची बिंदुनामावली विभागीय आयुक्त कार्यालय,मागासवर्ग कक्ष यांचे कडून दि.--------रोजी तपासणी करुन घेतलेली आहे. व त्यांचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

सदर अभिप्राय विचारात घेता वर प्रस्तावित केल्याप्रमाणे पदे पदोन्नतीने भरणे योग्य होईल असे मत आहे.

वरील प्रमाणे रिक्त पदे लक्षात घेवून --------या पदाच्या पदोन्नतीचे नियम लक्षात घेवून------या पदाच्या दिनांक--------------च्या अंतिम सेवा जेष्ठता यादीतून (ज्याची प्रत सोबत प्रमाणित करुन जोडलेली आहे. त्याच शेरा रकान्यात अगोदरच पदोन्नत झालेले,सेवानिवृत्त झालेले,मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या तारखा दर्शविण्यात आल्या आहेत किंवा इतर अभिप्राय दिले आहेत.) पदोन्नती देण्यासाठी विचार क्षेत्रात आहेत. पदोन्नतीस पात्र दर्शविण्यात आलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची जात पडताळणी सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन करुन घेण्यात आली आहे.

(टिप - ज्या वर्षात पदोन्नती द्यावयाची आहे त्यावर्षापेक्षा मागील वर्षातील अंतिम सेवा जेष्ठता यादी विचारात घ्यावयाची असल्यास त्याची कारणे नमूद करावीत.)

प्रस्तुत संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्यासाठी जेष्ठता क्रमानुसार विचार क्षेत्रात (Zone of consideration) येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या यादीसमोर कर्मचाऱ्यांचा प्रवर्ग दर्शवून सोबत परिशिष्ट अ मध्ये दर्शविण्यात येत आहे.

<u>प्रमाणित करण्यात येते की,</u>

१) --------या संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनाक -------ची अंतिम जेष्ठता यादी साक्षांकित करुन पदोन्नती समितीच्या अवलोकनार्थ प्रस्तावासोबत ठेवली आहे. जेष्ठता क्रमानुसारच (परिशिष्टातील शेऱ्यात दर्शविल्यानुसार वगळवयाची सोडून) पदोन्नतीसाठी विचार क्षेत्रात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे परिशिष्ट अ मध्ये दर्शविण्यात आलेली आहेत.

२) ----------या पदासाठी पदोन्नतीच्या नियमाची साक्षांकित प्रत सोबत जोडली असून त्या संबंधातील सुधारणाचे शासन निर्णय/परिपत्रकांच्या साक्षांकित प्रती सुध्दा प्रस्तावासोबत ठेवल्या आहेत.

३) ----------------या संवर्गातील या वर्षात रिक्त झालेल्या पदांच्या ३ टक्के नुसार अपंगाचे आरक्षण --------प्रस्तावित आहे. (शा.नि. सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही १०९९/प्र.क्र.३७/९९/१६-अ, दिनांक ५ मार्च २००२)

४) पदोन्नतीसाठी विचार क्षेत्रात येणारे कर्मचाऱ्यांचे मागील पाच वर्षांचे (वर्ष----------)गोपनीय अहवाल पदोन्नती समितीच्या अवलोकनार्थ सोबत ठेवले असुन त्याची प्रतवारी व सरासरी प्रतवारी संबंधित परिशिष्टांमध्ये दर्शविण्यात आली आहे.

सदर प्रतवारी विचारात घेता विचार क्षेत्रातील सर्व -------/अ.क्र.---व--- वगळता इतर कर्मचारी सकृतदर्शनी गोपनीय अहवालाच्या दृष्टीकोनातून विचार करता पदोन्नतीसाठी पात्र आहेत.

५) परिशिष्टातील राखीव प्रवर्गातील उमेदवारांची जात पडताळणी प्रमाणपत्रे (जात वैधता) प्राप्त झाली किंवा नाही याबाबत परिशिष्टात दर्शविले आहे. *-------यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र अप्राप्त आहे/अवैध* ठरविले आहे. ज्यांची जात वैधता प्रमाणपत्रे प्राप्त आहेत त्यांची सदर प्रमाणपत्रातील जात व प्रवर्ग आणि सेवापुस्तकात व सेवाज्येष्ठता यादीत नोंदविलेला जात व प्रवर्ग एकसारखीच असल्याची खात्री केलेली आहे.

६) पदोन्नतीसाठी विचार क्षेत्रात मोडणाऱ्या व परिशिष्टांमध्ये दर्शविलेल्या कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय/न्यायिक* चौकशी असल्यास किंवा कर्मचारी निलंबित असल्यास त्याबाबतची माहिती परिशिष्टांमध्ये नमूद करण्याची दक्षता घेण्यात आली आहे. अ.क्र. -----त्यांचेविरुध्द विभागीय/न्यायिक* चौकशी सुरु / प्रस्तावित आहे /प्रस्तावातील कोणाविरुध्दही विभागीय/न्यायिक * चौकशी सुरु/प्रस्तावित नाही.

७) संबंधित विभागाने पदोन्नती समितीसमोर आवश्यकतेनुसार ठेवावयाची इतर माहिती खालीलप्रमाणे आहे.

(उदाहरणार्थ - तदर्थ पदोन्नती असल्यास त्याची कारणे/तपशिल ,मा.न्यायालयातील प्रकरणाच्या अंतिम निर्णयास अधिन राहुन पदोन्नती देण्याचे प्रस्तावित असल्यास त्याचा तपशिल किंवा सेवा जेष्ठता उमेदवारानी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे कनिष्ठ कर्मचाऱ्यांनी तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचे प्रस्तावित असल्यास त्याचा तपशिल)

------------------------------------------------------------------------------------

पदोन्नती विचार क्षेत्राबाबतचे विहित प्रपत्र बनविले आहे.

उपरोक्त प्रमाणे पदोन्नती प्रस्ताव विभागीय पदोन्नती समितीपुढे ठेवण्यासाठी सादर केले आहे. तरी पदोन्नती समितीच्या बैठकीसाठी तारीख व वेळ निश्चित होवून मिळणेस विनंती आहे.

या संवर्गासाठी मागील पदोन्नती समितीची सभा दिनांक -------------रोजी संपन्न झाली असुन त्या सभेचे इतिवृत्त सोबत अवलोकनार्थ सादर केले आहे.

लिपिक.

क.प्र.अ.-- सदर टिपणीत नमूद बाबींची मी स्वत: खात्री केली असुन त्या बाबी योग्य आहेत.

* पुढील बाबी वगळता

१) -------------------------- २) ----------------------अन्य बाबी योग्य आहेत. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

स.प्र.अ.-- वरील टिपणीत नमूद बाबींशी मी पुर्णत: सहमत आहे * /पुढील बाबी वगळता

१)-------------------------- २)----------------------अन्य बाबींशी सहमत आहे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>खाते प्रमुख</u> -- टिपणीत नमुद बाबींशी मी पुर्णपणे सहमत आहे. टिपणीत नमुद बाबी योग्य आहेत. तरी पदोन्नती समितीच्या बैठकीसाठी तारीख व वेळ निश्चित होवून मिळणेस विनंती आहे.

<u>सा.प्र.वि.</u>

<u>मा.मु.का.अ.</u>

# <u>पदोन्नती नमुना आदेश</u>

कार्यालय:-जिल्हा परिषद---------
विभाग :- ----------------------
जा.क्रमांक ---------------------
दिनांक :-

वाचा: १) पदोन्नती समिती सभा दिनांक चे इतिवृत्त.
२) कार्यालयीन मान्य टिपणी दिनांक

<u>आदेश :</u>

संदर्भीय पदोन्नती समितीच्या बैठकीत समितीने शिफारस केलेल्या खालील नमुद कर्मचाऱ्यांना जिल्हा सेवा(वर्ग-३) /तांत्रिक सेवा (वर्ग ३)* -----या पदावरुन तृतीय श्रेणी मधील ------------या पदावर सुधारीत वेतन संरचना रु.--------------/-ग्रेड पे रु. ----------------- या वेतनश्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेश होईपावेतो खालील नमुद शर्ती व अटीचे अधिन राहून पदोन्नती देण्यात येत असुन पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर नमुद रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | सध्या कार्यरत कार्यालयाचे नाव | पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेल्या कार्यालयाचे नाव | प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

<u>शर्ती व अटी:-</u>

१) उपरोक्त प्रमाणे संबंधितास महाराष्ट जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ तील ६मधील तरतुदीनुसार ११ महिने /एक वर्षाच्या* कालावधीसाठी तात्पूरत्या स्वरुपात* पदोन्नती देण्यात येत आहे. * सदर पदोन्नती ही ---------न्यायालयातील प्रकरण क्रमांक -------मधील अंतिम न्यायालयीन निर्णयास अधिन राहून देण्यात येत आहे.

२) उपरोक्त पदोन्नतीच्या पदाची वेतन निश्चितीसाठी शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग पी.वाय-१०८२/सी.आर./११००(१)/एसईआर-३, दिनांक ६.११.१९८४ नुसार संबंधिताने एक महिन्याचे आत विकल्प देणे आवश्यक राहील. मुदतीत विकल्प न दिल्यास नियमानुसार वेतन निश्चिती करण्यात येईल.

३) उपरोक्त पदोन्नत कर्मचाऱ्यास यापुर्वी सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना (१२ वर्ष )अथवा सुधारीत सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना (२४ वर्ष ) अंतर्गत वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी प्रदान करण्यात आलेली असल्यास त्यांची सदर पदोन्नतीमुळे पुन:श्च वेतन निश्चिती होणार नाही.

४)	यापूर्वी सेवांतर्गत/सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (१२/२४ वर्ष) अंतर्गत प्रदान करण्यात आलेले संबंधित कर्मचाऱ्यांनी उपरोक्त पदोन्नतीस नकार दिल्यास त्यांना सध्याचे पदाचे मुळ वेतनश्रेणीत पदावनत करण्यात येवून त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ तील नियम क्र.१२ नुसार करण्यात येईल.

५)	उपरोक्त पदोन्नत कर्मचाऱ्यांस त्यांना पदोन्नतीने दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यास्तव त्वरीत कार्यमुक्त करण्यात यावे व तसे केल्याचे या कार्यालयात कळवावे तसेच संबंधिताचे अंतिमवेतन प्रमाणपत्र जास्तीत जास्त ३० दिवसात संबधित कार्यालयास पाठवावे.

६)	उपरोक्त पदोन्नत कर्मचाऱ्यास पदोन्नती नाकारावयाची असल्यास त्यांनी आदेश मिळाल्याच्या तारखेपासून ------------------दिवसाचे आत------यांचे समक्ष कार्यालयीन दिवशी स्वत: उपस्थित राहून लेखी निवेदन सादर करावे.

७)	उपरोक्त पदोन्नत कर्मचाऱ्यांने त्यांचे पदस्थापनेत बदल करण्याबाबत कोणत्याही प्रकारच्या राजकीय/बाह्य दबाव आणल्यास /तसा प्रयत्न केल्यास अथवा पदोन्नतीच्या पदस्थापनेवर रुजु होण्यास टाळाटाळ केल्यास त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ तील नियम क्र.६(५)चा भंग केल्याचे गृहीत धरण्यात येईल व ते शिस्त व अपील नियमांतर्गत कार्यवाहीस पात्र राहतील.

८)	सदर आदेशाची नोंद मूळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद

प्रतिलिपी :

१)श्री./श्रीमती----------------,            ------------,मार्फत--------------------यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस अग्रेषित.

२) कार्यालय प्रमुख--------------यांना माहिती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित. वरील प्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) कार्यालय प्रमुख------------यांना माहिती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित .संबंधित पदोन्नत कर्मचारी आपले कार्यालयात रुजू झाल्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

४) खाते प्रमुख-----------------------जि.प.-------------यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस अग्रेषित.

५) -------------------जिल्हा परिषद ---------यांना माहिती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित.

६) मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी जिल्हा परिषद, -----------यांना माहिती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित .

७) निवड नस्ती.

## टिपणी

**विषय :- कंत्राटी ----संवर्गातील कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करणेबाबत.**
**(केवळ शिक्षण सेवक व ग्रामसेवक या पदांकरीता)**

संदर्भ:- पदानुसार संबंधित शासन निर्णय

उदा.१) कंत्राटी ग्रामसेवक- ग्राम विकास व जल संधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक/एपिटी२००५/ प्रक्र-२२९/ आस्था-८,मंत्रालय,मुंबई,२०,एप्रिल,२००६,

उदा. २) शिक्षण सेवक - शालेय शिक्षण विभाग,शासन निर्णय क्रमांक पीआरई २००२/३३९५/ प्रशि-१,दिनांक २७ फेब्रुवारी,२००३

**सादर,**

संदर्भिय शासन निर्णयानुसार कंत्राटी ---या पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना----- वर्षांनंतर सेवेत नियमित करण्याबाबत तरतुद आहे. संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे अटी निश्चित करुन देण्यात आल्या आहेत.

१. चारित्र्य पडताळणी अहवाल समाधानकारक असणे.
२. कामकाजासंदर्भातील अहवाल समाधानकारक असणे./गोपनीय अहवाल समाधानकारक असणे.
३. कंत्राटी ०३ वर्षाचा कालावधी नियमित सेवेने पूर्ण करणे.
४. अनुज्ञेय नसलेल्या रजा न उपभोगणे. अथवा उपभोगल्यास कंत्राटी कालावधी त्या प्रमाणात वाढविणे.
५. जात वैधता प्रमाणपत्र राखीव पदांवरील उमेदवारांनी सादर करणे.
६. अपंग,खेळाडू संवर्गातील उमेदवारांच्या प्रमाणपत्राचे सक्षम प्राधिकाऱ्याकडू न तपासणी करुन घेणे.

टिपणी मध्ये प्रस्तावित सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी उपरोक्त अटींची पुर्तता केल्याबाबतची खात्री केलेली आहे. अनुज्ञेय नसलेल्या रजा उपभोगलेल्या कर्मचाऱ्यांचा कंत्राटी कालावधी रजा दिवसाएवढा वाढविण्याबाबतही खातरजमा केलेली आहे तसेच संबधीताविरुध्द विभागीय/न्यायिक चौकशीची कार्यवाही प्रलंबित /प्रस्तावित नसल्याची खात्री करण्यात आली आहे. *तसेच सहाय्यक शिक्षकांचे बाबतीत ते आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करत असल्याची खात्री केली आहे.

कंत्राटी कर्मचारी कार्यरत असलेल्या कार्यालय प्रमुखांचा त्यांचा सेवाविषयक बाबी संदर्भात अभिप्राय घेण्यात आलेला असुन नियमित करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात अनुकुल असल्याचे निदर्शनास येते.

( * लागू नसलेला मजकुर खोडावा.)

नियमित करण्यासाठी प्रस्तावित कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत कार्यालयाचे नाव/पं.स.चे नाव | नियुक्ती प्रवर्ग नियुक्ती आदेश क्रमांक व दिनांक | सेवेत रुजु दिनांक | जात पडताळणी झाली आहे काय? | ०३ वर्षाच्या कालावधीत घेतलेल्या रजा (अनुज्ञेय नसलेल्या) | गोपनिय अहवालातील शेरा(तीन वर्षातील सरासरी) | सेवेत नियमित करण्याचा दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने टिपणीमध्ये प्रस्तावित ---------एवढ्या कर्मचाऱ्यांना सेवेत नियमित करण्यासाठी शिफारस करण्यात येते. या कर्मचाऱ्यांबरोबर नियुक्ती देण्यात आलेल्या व अद्याप सेवा नियमित न झालेल्या मात्र या प्रस्तावात समावेश नसलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या-------आहे. त्यांचे प्रस्ताव साधारणत: --------दिवसात सादर करण्यात येत आहेत.

आदेशार्थ तथा मान्यतेस सादर.

कनिष्ठ सहाय्यक
वरिष्ठ सहाय्यक

| | |
|---|---|
| कनिष्ठ प्रशासन अधिकारी<br>सहाय्यक प्रशासन अधिकारी | सदर टिपणीतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियमित करण्यासंदर्भातील बाबी मी स्वत: तपासलेल्या आहेत व त्या बाबी योग्य असल्याची खात्री केलेली आहे.<br>*प्रस्तावित कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी अनुक्रमे अनुक्रमांक -- ,--,--,--, हे नियमित करण्यासाठी सद्य:स्थितीत पात्र नसुन असुन इतर --- एवढे कंत्राटी कर्मचारी पात्र आहेत. त्यांना सेवेत नियमित करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे. |
| कार्यालय प्रमुख<br>सामान्य प्रशासन विभाग | सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाशी मी सहमत/असहमत असून शिफारस करण्यात येत आहे./नाही. |

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी

(*लागू नसलेला मजकुर खोडावा)

**आदेश**

क्रमांक - ------------
कार्यालय,जिल्हा परिषद,---------
दिनांक: -------------

**वाचा:-** १. कार्यालयाचे नियुक्ती आदेश दिनांक -------
२. कार्यालयीन मान्य टिपणी दिनांक------------

**<u>आदेश</u>**

खालील नमुद उमेदवारांना कंत्राटी ग्रामसेवक/शिक्षण सेवक या पदावर संदर्भीय आदेशान्वये नियुक्ती देण्यात आलेली होती. सदर कंत्राटी ग्रामसेवक/शिक्षणसेवक यांनी त्यांचा ३ वर्षाचा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्याचा अहवाल संबंधित गट विकास अधिकारी/गट शिक्षणाधिकारी यांनी दिलेला असुन त्यांना सेवेत नियमित करण्याची शिफारस केलेली आहे. संबंधीत कर्मचाऱ्यांनी आवश्यक अटींची पुर्तता केलेली असुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासुन जिल्हा परिषद सेवेत त्यांच्या सेवा नियमित करण्यात येत आहेत.

| अं.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव | कार्यरत कार्यालयाचे/ पंचायत समितीचे नाव | नियुक्ती प्रवर्ग | सेवेत रुजु दिनांक | सेवेत नियमित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

रकाना क्र.६ मधील दिनांकापासुन त्यांना सदर पदासाठी लागु असलेली वेतनश्रेणी रु.------ते ------ व ग्रेड-पे लागु होईल.नियुक्ती आदेशामध्ये नमुद इतर सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**जिल्हा परिषद,----**

प्रतिलिपी:-

१) मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद,---------
२) ---------विभाग प्रमुख,जिल्हा परिषद--------
३) गट विकास अधिकारी,पंचायत समिती, -------------
४) संबंधीतास.
५) आदर्श संचिका.